**अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणांवर करावयाची कार्यवाहीची कार्यपध्दती**

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, 1966 मधील सुधारणेप्रमाणे प्रभाग समितीसाठी संबंधित सहाय्यक आयुक्त यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याची जबाबदारी पदनिर्देशित अधिकारी यांची आहे.

2. ज्या इमारतींचे बांधकाम विकास प्रस्ताव अंतर्गत येत नाही तसेच विकास प्रस्ताव अंतर्गत येणाऱ्या बांधकामाचा वापर परवाना घेतल्यानंतर त्यामध्ये वाढीव बांधकाम झाले आहे अशी पदनिर्देशित अधिकाऱ्याची खात्री झाल्यास अशा बांधकामांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 260 प्रमाणे व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 52 व 53 प्रमाणे नोटीस संबंधित पदनिर्देशित अधिकारी यांनी द्यावयाची आहे.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 267 (1) नुसार बांधकाम थांबविणेबाबत नोटीस बजावण्यात येते.

4. बांधकामधारकाने नोटीसीच्या अनुषंगाने दिलेल्या उत्तरासह स्पष्ट केलेली कागदपत्र तपासून त्यांना वैयक्तिक सुनावणी देण्यात येते. सुनावणीस बांधकामधारक हजर नसल्यास त्यांना सुनावणीची पुन्हा संधी देण्यात येते (श्री.मारुती सोपान थोपटे विरुध्द पुणे महानगरपालिका या दाव्यात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये).

5. सुनावणी दरम्यान सादर केलेल्या कागदपत्रांवरून बांधकाम अनधिकृत असल्याचे सिध्द झाल्यास बांधकाम हटविणेबाबतचे आदेश पारित करण्यात येतात. संबंधितांनी बांधकाम न हटविल्यास, सदरचे बांधकाम महापालिकेकडून हटविण्यात येते.

6. बांधकाम अनधिकृत असल्याने संबंधित बांधकामधारकावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 52 व 53 अन्वये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 297 (क) अन्वये संबंधित पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येतो.

7. बांधकामाचा वापर सुरू झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 268 (1) (2) (3) (4) अन्वये भोगवटा रिक्त करणेबाबतच्या नोटीसा बजावण्यात येतात. तसेच भोगवटा रिक्त न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 268 (5) अन्वये संबंधित पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांना संबंधित इमारतीमधील भोगवटा रिक्त करण्याचे निर्देश देण्यात येतात. भोगवटा रिक्त केल्यानंतर सदर बांधकाम निष्कासित केले जाते.